# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad@dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९/ ८०५

दिनांक :- 31 JAN 2019

प्रति,

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय/औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय,औरंगाबाद

उपसचिव तंत्रशिक्षण मंडळ, प्रा. का. औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, औरंगाबाद/जालना/अंबड/हिंगोली/नांदेड/जिंतूर/बीड/उस्मानाबाद /पु.ला.शा.तं.लातूर/निवासी महिला लातूर

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच वेगवेगळया शासकीय विभागातील सरळसेवा भरती प्रक्रियेच्या स्पर्धा परीक्षेकरिता ना-हरकत /परवानगी देणेबाबत.

असे निदर्शनास आले आहे. की.महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच वेगवेगळया शासकीय विभागातील सरळसेवा भरतीसाठी जाहिरात निघाल्यास एकच कर्मचारी वेगवेगळया शासकीय विभागातील जाहिरातीनुसार अर्ज करतात. पर्यायाने या कार्यालयामध्ये येणा-या अर्जाची संख्या खुपच प्रमाणात असते. वेगवेगळया विभागातील पदासाठी होणा-या परीक्षेस बसण्यासाठी प्रत्येक कर्मचा-यांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे या कार्यालयातील कार्यबाहुल्यामुळे अडचणीचे ठरत आहे.

त्यानुसार असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच वेगवेगळया शासकीय विभागातील सरळसेवा भरतीसाठी जाहिरात निघाल्यास कर्मचा-याने जाहिरातीतील पदास आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हता व इतरअटींची पुर्तता करीत असल्यास अर्ज करण्यास संस्था प्रमुखामार्फत या कार्यालयास अर्ज करण्यात यावा. संबधित कर्मचारी सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र पडताळणी/मुलाखतीसाठी उपस्थित राहण्यासाठी या कार्यालयाकडून कर्मचा-यांची आवश्यकता विचारात घेऊन ना-हरकत प्रमाणपत्र देण्याविषयी कार्यवाही करण्यात येईल. ही बाब आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

C/Deepak/Asta3\CIRCULAR/